## रे.क.नं.६२/२०१० मधील निशाणी ५ खालील आदेश

१.    वादीने प्रतिवादीविरूध्द प्रस्तुतचा अर्ज तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरिता (दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ नुसार) दाखल केला आहे.

२.    अर्ज संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे :—

प्रस्तुतचा दावा वादीने वाटपाकरीता व निरंतरचे मनाई हुकूमाकरीता केलेला आहे. सदर दाव्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज दाव्याचे निकाल लागेपावेतो प्रतिवादी अगर त्यांचेतर्फे कोणीही दावा मिळकत विक्री, हस्तांतर ईत्यादी करू नये अशी मागणी केली आहे. वादीने अर्ज परिच्छेद क्र.१ ते ८, ९ ते १७ येथे दावा मिळकतीचे विस्तृतपणे वर्णन केलेले आहे. (सोईकरीता यापुढे ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात येत आहे). वादीचे कथनानुसार दावा मिळकती या शेतजमीनी व घर मिळकती असून मुळ रावजी कृष्णा डमाळे म्हणजेच वादी नं.१ व २ यांचे आजोबा वादी नं.३ यांचे मालकी कब्जे वहिवाटीत होते. सन—१९६९/७० चे दरम्यान रावजी मयत झाले. वादी नं.१ व २ हे शिवराम रावजी डमाळे यांची मुले असुन वादी नं.३ हा नातू आहे. प्रतिवादी १ हे वादीचे वडील असून २ आई आहे. प्रतिवादी ३, ४ व ८ हे भाऊ असुन प्रतिवादी ६, ७, ९ व १० हया बहिणी असून प्रतिवादी नं.५ ही प्रतिवादी नं.४ ची पत्नी आहे. वादी नं.३ हा प्रतिवादी नं.४ चा मुलगा आहे. श्रीमती सुवर्णा सुधाकर दामले ही प्रतिवादी नं.४ ची पहिली पत्नी आहे. वादी नं.३ हे नाशिक येथे राहतात. दावा मिळकत ही वादी व वादी क्र.१ ते ३ व प्रतिवादी यांची अविभक्त हिंदु एकत्र कुटूंबांच्या मिळकती आहेत. आजपावेतो सरस निरस मानाने वाटणी झाली नाही. वादी यांचा दावा मिळकतीत अविभक्त असा हिस्सा आहे. वादी नं.१ व २ दुसरीकडे राहत असुन मजुरी करून उदरनिर्वाह करत आहेत. वादी नं. ३ व ४ हे नाशिक येथे राहून उदरनिर्वाह करतात. दावा मिळकतीला प्रतिवादी यांचे मालक सदरी नाव लागल्याचा गैरफायदा घेवुन विक्री करण्याची भाषा करीत आहेत. दाव्यातील काही जमीनी काही इसम पाहुन गेल्याचे समजले. वादी यांची सम्मती न घेता काही मिळकतीवरती कर्ज घेतलेले आहे. प्रतिवादी दावा मिळकतीची देखभाल करत नाही, उत्पन्न वादीला देत नाहीत. प्रतिवादी दावा मिळकतीवर कर्ज घेवुन अफरातफर करण्याच्या प्रयत्नात आहेत. दावा मिळकतीमध्ये वादी नं. १ ते ३ यांचा वडीलोपार्जित हिस्सा आहे. वादींनी हिश्याची मागणी केली असता प्रतिवादी टाळाटाळ करीत आहे. प्रतिवादींनी दावा मिळकत विकल्यास वादीच्या मालकी हक्कास बाधा निर्माण होणार आहे, वादीस प्राईमा फेसी केस चांगली आहे, न्यायाचा तराजु वादीचे बाजुने आहे, वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. येणेप्रमाणे

कारणांचा विचार होवुन दाव्याचे निकाल लागेपावेतो प्रतिवादी अगर त्यांचेतर्फे कोणीही दावा मिळकत विक्री, हस्तांतर ईत्यादी करू नये अशी मागणी केली आहे.

३.        प्रतिवादी १ व ६ ते १० यांनी नि.३४ येथे कैफियत—नि—म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने खोटा व चुकीचा दावा केला आहे. काही मिळकतीच्या चतु:सीमा चुकीच्या नमुद केल्या आहेत. गट नं.५९ या मिळकतीमध्ये एक पक्के घर असून त्याची माहिती दिलेली नाही, प्रतिवादी नं.३ च्या कब्जात घर आहे. गट नं.६७० मधिल काही क्षेत्र पडीत असून ते प्रतिवादी नं. ३ चे कब्जात आहे. गट नं.२७२ या मिळकतीमध्ये वादींनी हिस्सा नमुद केला नाही. रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे असलेले सह हिस्सेदार यांना पार्टी केलेले नाही. या प्रकारे गट नं.७२०अ/१/१ या मिळकतीच्या चतु:सीमा चुकीच्या नमुद केल्या आहेत. सदर मिळकतीबाबत दिवाणी न्यायालय, नाशिक यांचेकडील हुकूमनाम्याअन्वये ६ड नोंद नं.६४९४ अन्वये प्रतिवादी नं.१ व प्रतिवादी नं.२ यांना दिलेली आहे. सदर मिळकत ही प्रतिवादी नं.२ यांचे स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. गट नं.२६ या मिळकतीचे दिवाणी कोर्टाचे हुकूमनाम्याअन्वये प्रतिवादी नं.२ चे लाभात पुर्वीच आदेश झालेला असून ६ड नोंद झालेली आहे. दावा मिळकतीचे मुल्यांकन चुकीचे दाखविले आहे. दावा कलम १२ मधिल नमुद क्रेन मशिन हे प्रतिवादी नं.४ ने खरेदी केले असुन त्यांचे मालकीचे आहे. दावा कलम १३ मध्ये मोटार पंप प्रतिवादी नं.२ चे मालकीचा आहे. दावा कलम १४ मधिल ३ विहीरी व बोअर असून, त्यांचेशी वादीचा काही संबंध नाही. एक विहीर सामाईक आहे, त्यामध्ये ईतर सहहिस्सेदार आहेत. त्या विहीरी वादींनी दावा मिळकतीमध्ये सामील केलेल्या नाहीत. दावा कलम १५ मधिल झाडांची किमंत नमुद केली नाही. दावा कलम १६ मध्ये जनावरे नमुद केले आहेत त्यांच्याशी वादींचा काही संबंध नाही. वादींनी वंशवृक्षात दर्शविलेप्रमाणे प्रतिवादी नं.५ यांचा वादी व प्रतिवादी यांच्या वाटपामध्ये कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. सदर मिळकती प्रतिवादी नं.५ यांच्या स्वकष्टार्जीत आहेत. प्रतिवादी नं.२ यांना न्यायालयाचे हुकूमनाम्याअन्वये मिळालेल्या मिळकती या प्रतिवादी यांच्या मालकीच्या आहेत, वादी यांचा कुठलाही संबंध नाही. वादी यांनी वंशवृक्षात दर्शविलेले भामाबाई, इंदुबाई ईत्यादी यांना जाणीवपुर्वक सामील केले नाही. वंशवृक्ष हा अपुर्ण स्वरूपाचा आहे. प्रतिवादी ६, ७, ९ व १० या बहिणी असुन त्यांचा दावा मिळकतीत कब्जा नाही असे खोटे नमुद केले आहे. दावा कलम १ मधिल नमुद शेत व घर मिळकत या प्रतिवादी यांच्या स्वकष्टार्जीत मालकीच्या आहेत. वादी नं.३ चे नातेसंबंध चुकीचे दाखविले आहेत. वादी नं.३ चा प्रतिवादी नं.४ शी

कुठलाही संबंध नसुन श्रीमती सुवर्णा सुधाकर डमाळे हिचाही प्रतिवादीशी कोणताही सबंध अथवा नातेसंबंध नाही. वादी नं.३ कोठे राहतात याबाबत प्रतिवादींना माहिती नाही. दावा मिळकती एकत्र कुटूंबांच्या नाहीत.

४.        पुढे प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, दावा परिच्छेद क्रमांक १ मधिल ब—याच मिळकती या प्रतिवादी नं.२ व ५ यांच्या नावे असून स्वकष्टार्जीत मालकीच्या आहेत, वादींचा त्या मिळकतीशी कसलाही संबंध नाही. दावा परिच्छेद क्रमांक २ नमुद मिळकती शेतजमीन, विहीर ईत्यादी यांच्याशी वादी नं.१ ते ३ यांचा कुठलाही संबंध नाही. दावा मिळकती या वडीलोपार्जित नाहीत. सदर मिळकतीपैकी क्रेन, फळझाडे, विहीर ईत्यादी अस्तित्वात नसतांनाही व त्यांचेशी वादींचा कुठलाही संबंध नसतांना चुकीने दाव्यामध्ये नमुद केले आहे. वादींनी केलेल्या कथनानुसार सन—२०१० च्या सुमारास वाटपाबाबत मागणी केली व प्रतिवादी नं.४ व ५ यांनी मागणी केली, त्याबाबत दिंडोरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद झाला हे खोटे कथन आहे. वादीने दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार सामील केले नाहीत. प्रतिवादी नं. १ चे वडील मयत रावजी कृष्णा हे होते. रावजी यास प्रतिवादी नं.१ शिवराम व दुसरा मोठा मुलगा मुरलीधर रावजी आहेत. मयत रावजी व मोठा मुलगा मुरलीधर यांनी प्रतिवादी नं.१ यांस सन १९६५ साली घरातुन बेदखल केले. त्यावेळी प्रतिवादी नं.१ हा त्याची पत्नी व त्यावेळेस असलेले दोन मुले व दोन मुली यांना घेवुन स्वतंत्र राहु लागले. प्रतिवादी नं.१ यांना उदरनिर्वाहासाठी कोणतीही जमीन देण्यांत आली नव्हती. त्यानंतर सन १९७२ मध्ये दुष्काळ पडला. प्रतिवादी नं.१ चे मोठे बंधु मुरलीधर यांना जिरायत गट नं.७२०, २६, ५९ व ६७० पैकी काही क्षेत्र वहिती करून खाणेकरीता प्रतिवादी नं.१ यास दिले. सन १९८७ चे दरम्यान आंब्याच्या झाडावरून प्रतिवादी नं.१ यास त्याचा मोठा भाऊ मुरलीधर याचे मुलांनी मारहाण करून आब्यांचे फळ देण्यास नकार दिला, त्यावेळी भांडण होवुन फौजदारी केसेस दिंडोरी कोर्टात दाखल झाल्या. त्यापुर्वी प्रतिवादी नं.३, ६ व ७ यांचे विवाह झाले होते. प्रतिवादी नं.३ सन १९८३ पासून वेगळे राहत असून गट नं.५९, ६७० मध्ये उत्पन्न घेवुन उदरनिर्वाह करीत आहेत. गट नं.५९ व ६० या मिळकतीपैकी प्रतिवादी नं.१ चे मोठे भाऊ मुरलीधर यांचा गट नं.६१ मध्ये वडीलोपार्जित असलेल्या विहीरीतुन पाणी घेण्याचा अधिकार आहे. सन—१९८७ पासून प्रतिवादी नं.१ व ईतर प्रतिवादी त्याचप्रमाणे प्रतिवादी नं.१ चा भाऊ मरुलीधर व त्यांची मुले यांचेत आपसात समजुतीची बोलणी होवुन सन १९८५ साली प्रतिवादी नं.१ च्या नावाने काही मिळकती घेण्यांत आल्या व प्रतिवादी नं.१ भाऊ मुरलीधर यांच्या नावाने काही मिळकती

घेण्यांत आल्या. सदर मिळकती जिरायती स्वरूपाच्या होत्या, उत्पन्न मिळकत नसे. त्यावेळी वादी नं.१२ चे कुटंबांतील व्यक्ती या मजूरी करून हातभार लावुन कुटूंबांचा उदरनिर्वाह करीत होते. त्याचप्रमाणे प्रतिवादी नं.४ यांनी स्वकष्टातुन शिक्षाण केले व मिळणा—या उत्पन्नातुन प्रतिवादी नं.१ च्या कुटूंबांला मदत केली. प्रतिवादी नं.६ ते १० यांचे लग्नासाठी खर्च हा प्रतिवादी नं.४ ने स्वतःचे नोकरीचे उत्पन्नातुन व बॅन्क कर्ज करून केले आहे. प्रतिवादी नं. १ ने गट नं.४२ पैकी हे.१.७१ आर क्षेत्र विक्रीस काढुन सन २००५ मध्ये प्रतिवादी नं.८ चे लग्न केले. प्रतिवादी नं.८ चे लग्न केल्यानंतर प्रतिवादी व त्यांची पत्नी यांचेमध्ये वाद निर्माण झाल्याने कोर्ट कचेरीत केसेस दाखल झाल्या. त्याकामी प्रतिवादी नं.२ ने ब—याच मोठया प्रमाणात खर्च केला व फारकतीकामी रक्कमही दिली. प्रतिवादी नं.१ ने खर्च केला आहे, गट नं.४२ कोर्टाच्या आदेशानुसार प्रतिवादीने तबदिली केली आहे. प्रतिवादी नं.१ व २ यांच्यात वाद निर्माण झाले त्यावेळी प्रतिवादी नं.२ ने प्रतिवादी नं.१ विरूध्द दिवाणी कोर्टात दावा दाखल केला त्यावेळी नाशिक कोर्टात हुकूमनाम्यानुसार गट नं.७२०अ/१/१ क्षेत्र हे.१.६२ आर व गट नं.२६ मधिल क्षेत्र हे.१.८२ आर विहीर ईत्यादीसह प्रतिवादी नं.२ यांना देण्यात आले. गट नं.६७०/३ पैकी काही क्षेत्र प्रतिवादी नं.३ यांचे कब्जात असून गट नं.५९ व ६० हे प्रतिवादी नं.३ च्या कब्जेवहिवाटीत आहे. गट नं.६१ मधिल सामुहीक विहीरीतील पाणी घेण्यांत येत आहे. दावा मिळकतीमध्ये वाद निर्माण करण्याचा वादींना कायदयाने अधिकार नाही, वादींनी तोंडी स्वरूपात कधीही मागणी केली नाही अगर नोटीस दिली नाही. वादी नं.१ व २ यांनी वादी नं.३ चे नातेवाईक, प्रतिवादी नं.३ चे सांगणेवरून खोटया स्वरूपाचा दावा, खोटी माहिती नमुद करून दावा दाखल केला आहे. दावा मिळकती या प्रतिवादींच्या मालकीच्या झालेल्या आहेत, प्रतिवादी हे सदर मिळकतीमधील कोणताही भाग विक्री करणार नाहीत त्यामुळे तुर्तातुर्त मनाई हुकूम मागण्याचा अधिकार वादींना नाही. वादींना सकृतदर्शनी केस नाही, बॅलन्स ऑफ कनव्हीअन्स वादीचे लाभात नाही, तुर्तातुर्त हुकूम न दिल्यास वादीचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. वादीने त्रास देण्याच्या उददेशाने दावा केला आहे. वादीचा अर्ज रूपये १०,०००/— चे खर्चासह फेटाळण्यात यावा असे म्हणणे दाखल केलेले आहे.

५.	प्रतिवादी क्र.२ यांनी कैफियत—नि—म्हणणे नि.३६ येथे दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांनी वादी यांचे कथन नाकारले, त्यांच्या म्हणण्यानुसार दावा परिच्छेद क्रमांक २ गट नं.४२ ही मिळकत प्रतिवादी नं.१ यांनी नाशिक येथील दिवाणी

न्यायालय यांच्या हुकूमनाम्याप्रमाणे तबदिली केली आहे, त्या मिळकतीशी वादी व ईतर प्रतिवादी यांचा काही संबंध नाही. गट नं.५९ मध्ये पक्के घर असून, त्याचा उल्लेख वादीने केला नाही, सदर मिळकत प्रतिवादी नं.३ च्या कब्जात आहे. गट नं.४७० ही मिळकत काही क्षेत्र पडीत असून प्रतिवादी नं.३ च्या कब्जात आहे, त्याचा वाद जिल्हाधिकारी यांचेकडे चालु आहे, त्याची माहिती दिली नाही. गट नं.२७२ व गट नं.२७३ मध्ये सहहिस्सेदार यांना दाव्यामध्ये पक्षकार केले नाही. गट नं.७२०अ/१/१ मिळकत दिवाणी न्यायालय, नाशिक यांचे हुकूमनाम्यानुसार ६ड ची नोंद नं.६४९४ अन्वये प्रतिवादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.२ यांना दिली आहे. गट नं.२६ ही प्रतिवादी नं.२ यांना दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार देण्यांत आली आहे. दावा परिच्छेद क्रमांक १० ते १६ मध्ये घर मिळकती, केन, झाडे, बोअर, म्हशी ईत्यादीबाबत वादीने चुकीची माहिती दिली आहे. वादीने वंशवृक्ष चुकीचा दर्शविला आहे, प्रतिवादी नं.५ यांचा वादी व प्रतिवादी यांच्या वाटपामध्ये कोणताही संबंध नाही. त्यांचे नावाने असलेल्या मिळकती या स्वकष्टार्जीत खरेदी मालकीच्या आहेत. वशंवृक्षात भामाबाई, इंदुबाई, चंद्राबाई यांना दाव्यामध्ये जाणीवपूर्वक सामील केले नाही. रावजी कृष्ण डमाळे सन—१९६९—७० च्या दरम्यान गावी मयत झाले हे चुकीचे नमुद केले आहे. वादी नं.३ चा प्रतिवादी नं.४ शी कुठलाही नातेसंबंध नाही. दावा परिच्छेद क्र.२ चे पोटकलम ४ मधिल मजकुर चुकीचा नमुद केला आहे, दावा परिच्छेद क्र.१ मधिल ब—याच मिळकती प्रतिवादी नं.२ व ५ यांच्या स्वकष्टार्जीत मालकीच्या आहेत. पुढील काही कथने ही प्रतिवादी नं.१ व ६ ते १० नुसार असल्याने पुर्न:रूत्ती टाळत आहे. प्रतिवादी नं.२ वयस्कर असून औषधोपचार घेत आहे, त्यांचे मिळकतीत वादी यांना कुठलाही कायदेशिर हक्क नाही. वादींना सकृतदर्शनी केस नाही, बॅलन्स ऑफ कनव्हीअन्स वादीचे लाभात नाही, तुर्तातुर्त हुकूम न दिल्यास वादीचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. वादीने त्रास देण्याच्या उददेशाने दावा केला आहे. वादीचा अर्ज रूपये १०,०००/— चे खर्चासह फेटाळण्यात यावा असे म्हणणे दाखल केलेले आहे.

६.    प्रतिवादी क्र.३ विरूध्द एकतर्फा आदेश झाला आहे. प्रतिवादी क्र.४ यांनी त्यांचे कैफियत—नि—म्हणणे नि.५४ येथे दाखल केलेले आहे. वादीचे कथन नाकारले आहे, त्यांनी प्रतिवादी क्र. १, ६ ते १० व प्रतिवादी क्र.२ चे कैफियतीनुसार अधिकतर कैफियतीमध्ये पुर्न:रूत्ती केली आहे, त्यामुळे म्हणणे विस्तृतपणे नमुद करणेचे टाळत आहे, याव्यतिरिक्त थोडक्यात त्यांचे म्हणणे असे आहे की, हिं.मॅ.पि.नं.२२४/९५ मध्ये वादी नं.४ यांनी स्वत:चे तसेच वादी नं.३ यांचे सर्व हक्क, अधिकारी कायमचे

सन–१९९५ मध्ये सोडून दिले आहेत. प्रतिवादी नं.४ अथवा वादी नं.३ व कथीत वादी नं.४ यांनी कोणतेही केसेस अगर दावे करायचे नाही असे ठरले असतांना वादी नं.३ व कथीत वादी नं.४ यांनी कोणत्याही प्रकारे हक्क व अधिकार नसतांना दावा केला आहे. प्रतिवादी नं.४ यांनी १९६९ मध्ये मुंबई येथे जावुन मिळेल ते कष्ट करून प्रतिवादी क्र.१, २, ६ व ७ यांचे पालनपोषण, शिक्षण ईत्यादी करण्यास हातभार लावला. सन–१९७९ दरम्यान सातपुर, नाशिक येथे व्ही.आय.पी.कंपनी येथे नोकरीस लागले. प्रतिवादी नं.१ व २ यांचा मोठा मुलगा प्रतिवादी नं.३ याचा विवाह १९८१ साली करून दिला. प्रतिवादी नं.३ दोन वर्षात पत्नीसह वेगळा राहू लागला, घरच्यांची चौकशी करीत नाही. प्रतिवादी नं.६ चा विवाह सन–१९८३ मध्ये केला, त्यावेळी सोसायटीतुन रूपये १८,०००/– कर्ज प्रतिवादी नं.४ ने घेतले. प्रतिवादी नं.७ चे विवाहकरतादेखिल नोकरीचे ठिकाणी रूपये २५,०००/– कर्ज काढुन लग्नाला मदत केली. प्रतिवादी नं.७ चा विवाह सन–१९८५ मध्ये झाला. सन–१९७२ साली दुष्काळ पडला होता, कोणतेही उत्पन्न येत नव्हते, त्यामुळे १९८० पासून २००० पर्यंत प्रतिवादी नं.१, ६, ७ व वादी नं.१ व २ लोकांकडे मजूरी करीत असे. प्रतिवादी नं.४ यांनी सन–१९९६ ला स्वकष्टार्जीत मिळकतीतुन रूपये २५,०००/– ला ओझर येथून क्रेन खरेदी केली. दरम्यान वकीलाचे शिक्षण घेत कोर्टामध्ये वकीलांकडे रूजू झाले. कथीत वादी नं.४ सोबत लग्न झाल्यानंतर, प्रतिवादी क्र.४ ची फसवणुक झाल्याचे समजले. प्रतिवादी क्र.४ ने वादी नं.४ कडे लग्नापुर्वीबाबत ईतिहास विचारला असतांना सांगितला की, तिचे मावशीचा मुलगा नाना यांचेशी शरीरसंबंध होते. वरील बाब वादी नं.४ ने आई व मावशीला सांगितली, त्यांनी प्रतिवादी नं.४ ला येवुन धमकावले. प्रतिवादी ४ विरूध्द खोटी भा.दं.वि.४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ नुसार वादी व तिच्या आईवडीलांनी फिर्याद दाखल केली. वादी नं.४ ने हिन्दु मॅरेज पिटीशन नं.२२४/९५ मध्ये स्वत: व वादी क्र.३ करीता रक्कम घेवुन सर्व हक्क अधिकार कायमस्वरूपी सोडून दिले आणि घटस्फोट घेतला. प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.८ चा विवाह करण्याकरीता गट नं.४२ विक्रीस काढले असता प्रतिवादी नं.५ ची आई व प्रतिवादी नं.५ ने प्रतिवादी नं.१ यांचेशी व्यवहार करून दावा मिळकत खरेदी घेतली. वादींना दावा मिळकतीत प्रथमदर्शनी केस नाही, बॅलन्स ऑफ कनव्हीअन्स वादीच्या लाभात नाही. वादी नं.३ यांनी दावा मिळकतीला नावे लागण्याचा प्रयत्न केला, असफल झाले, त्यामुळे वादी नं.१ व २ यांना हाताशी धरून प्रतिवादी नं.४ ला त्रास देण्याकरीता खोटा दावा केला आहे. अर्ज नामंजुर केल्यास वादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही, येणेप्रमाणे कारणांचा विचार होवुन वादीचा अर्ज खर्चासह रदद् करण्यांत यावा अशी मागणी

केलेली आहे.

७.	प्रतिवादी नं.५ यांनी नि.५६ येथे कैफियत—नि—म्हणणे दाखल केलेले आहे. वादीचे कथन नाकारले आहे, त्यांनी प्रतिवादी क्र. १, ६ ते १० व प्रतिवादी क्र.२ व ४ चे कैफियतीनुसार अधिकतर कैफियतीमध्ये पुर्नःरूत्ती केली आहे, त्यामुळे म्हणणे विस्तृतपणे नमुद करणेचे टाळत आहे, याव्यतिरिक्त थोडक्यात त्यांचे म्हणणे असे आहे की, प्रतिवादी नं.१ ने गट नं.४२ विक्रीस काढले असता त्यांनी खरेदी घेतले आहे. तसेच प्रतिवादी नं.४ यांनी गट नं.२६ मधिल ४० आर क्षेत्र विक्रीस काढले असता खरेदी घेतले आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.१ ते ४ व ६ ते १० यांचा वरील मिळकतीशी काही संबंध नाही. वादी नं.३ यांनी वादी नं.१ व २ यांना फुस लावुन त्रास देण्याकरीता खोटा दावा केला आहे. वादीस सकृतदर्शनी केस नाही, बॅलन्स ऑफ कनव्हिअन्स वादीचे बाजुने नाही. अर्ज मंजुर न केल्यास वादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही, येणेप्रमाणे कारणांचा विचार होवुन वादींचा अर्ज खर्चासह रदद् करण्यांत यावा असे म्हणणे दाखल केले आहे.

८.	वादी व प्रतिवादी यांच्या आपापल्या केसचा विचार करता या अर्जाचे निवाडयाकरता खालील मुददे उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे.

| | मुददे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १) | वादीस सकृतदर्शनी केस आहे का ? | .. | वादी क्र.१ व २ यांना सकृतदर्शनी केस आहे. वादी क्र.३ यांस नाही. |
| २) | अनुकुलता समतोल (Balance of convenience) कोणाचे बाजूने आहे? | .. | प्रतिवादींचे होणार आहे. |
| ३) | अपरिमित नुकसान (irreparable loss) कोणाला होणार आहे ? | .. | प्रतिवादींचे होणार आहे. |
| ४) | कोणता आदेश ? | .. | अंतिम आदेशानुसार. |

**—: <u>का र णे</u> :—**

**<u>मुददा कं.१ ते ४</u> :—**

९.	वादीचे बाजूने सकृतदर्शनी केस आहे का? हे पहाणेसाठी न्यायालयाकडे

वादीने केलेली तक्रार ही वादीच्या कायदेशीर हक्कावर बाधा येते काय? तसेच पक्षकारामध्ये खरेच असे काय वादाचे कारण आहे व त्याचा निवाडा करणे अत्यंत जरूरीचे आहे. ते पहाणेसाठी दावा अर्जामध्ये नमूद केलेल्या तक्रारी, आलेले म्हणणे व सादर केलेले कागदोपत्रे न्यायालयाने पहाणेचे जरूरीचे आहे.

१०.     वादींनी प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता केला आहे. दाव्यामध्ये निशाण–५ दाखल करून अशी मागणी केली आहे की, दाव्याचा निकाल लागेपावेतो प्रतिवादी अगर त्यांचेमार्फत इसम, एजंट ईत्यादी यांनी दावा मिळकत विक्री, हस्तांतरीत करू नये असा तुर्तातूर्त आदेश करावा. वादीची थोडक्यात केस अशी आहे की, दाव्यामध्ये दावा परिच्छेद क्र.१ ते ११ मधिल नमुद मिळकती या मुळच्या रावजी कृष्णा डमाळे म्हणजे वादी नं. १ व २ यांचे आजोबा, वादी नं.३ यांचे पंजोबा यांच्या मालकी वहिवाटीच्या आहेत. वादी नं.१ व २ हे शिवराम रावजी डमाळे यांची मुले असून वादी नं.३ हा नातू आहे. प्रतिवादी १ हे वादीचे वडील असून प्रतिवादी २ ही वादीची आई आहे, प्रतिवादी ३, ४ व ८ हे भाऊ असून प्रतिवादी नं.६, ७, ९ व १० या बहिणी असून प्रतिवादी नं.५ ही प्रतिवादी नं.४ ची पत्नी आहे. वादी नं.३ हा प्रतिवादी नं.४ चा मुलगा आहे. सुवर्णा सुधाकर दामले ही प्रतिवादी नं.४ ची पहिली पत्नी आहे, वादी नं.३ नाशिक येथे राहतात. वादींच्या कथनानुसार दावा मिळकत एकत्र कुटूंबांची असून अद्याप सरसनिरस मानाने वाटप झाले नाही, सबब, प्रस्तुतचा दावा आणि अर्ज.

११.     प्रतिवादी नं.४ यांचे थोडक्यात असे कथन आहे की, श्रीमती सुवर्णा सुधाकर दामले यांचेशी विवाह झाला होता, प्रतिवादी नं.४ ची फसवणुक झाली होती, प्रतिवादींविरूध्द खोटे फौजदारी केसेस दाखल केल्या होत्या, दरम्यान हिन्दु मॅरेज पिटीशन नं.२२४/१९९५ नुसार सुवर्णा सुधाकर दामले यांनी स्वत: व वादी नं.३ करिता रोख रक्कम घेवुन सर्व हक्क सोडले. दावा मिळकती या काही प्रतिवादींच्या स्वकष्टार्जीत मिळकती आहेत, तथाकथित सुवर्णा सुधाकर दामले यांनी वादी नं. १ व २ यांना हाताशी धरून वादी नं.३ करवी खोटा दावा केलेला आहे. दावा मिळकती वडीलोपार्जित नाहीत. दावा मिळकतीमध्ये नमुद क्रेन, घरे ईत्यादी काही प्रतिवादी यांनी स्वकष्टार्जीत प्राप्त केल्या आहेत, केवळ त्रास देण्याकरीता सुवर्णा यांनी वादी नं.१ व २ यांना हाताशी धरून वादी नं.३ करवी खोटा दावा केला आहे. याउपर वादी नं.३ व सुवर्णा यांनी दावा मिळकतीला नांवे लावण्याचा प्रयत्न केला, असफल झालेने प्रस्तुतचा खोटा दावा केलेला आहे.

१२.        वादी व प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन पाहता, असे दिसून येते की, वादी नं.१ व २ हे प्रतिवादी नं.१ व २ ची मुले आहेत, त्यांच्या म्हणण्यानुसार मयत रावजी कृष्णा डमाळे हे आजोबा होते. दावा मिळकत ही वडीलापार्जित आहे, वाटप झाली नाही, दावा मिळकतीमध्ये त्यांचा हिस्सा आहे. वादी नं.३ हा प्रतिवादी नं.४ चा मुलगा असल्याचे कथन करतात. निशाण—३/१ ते १२ येथे ७/१२, ६ड व घरमिळकतीचे उतारे दाखल केले आहेत. सदर उतारे पाहता ६ड नोंद क्र.२९८ नुसार वाटप झाल्याची नोंद दिसून येते, त्यानुसार वंशवृक्ष नुसार काही मिळकती शिवराम म्हणजे प्रतिवादी नं.१ व मुरलीधर यांचेमध्ये वाटप झाले आहे. ही बाब वादीच्या कथनाला पुष्टी देत नाही. याउप्पर वादी नं.१ व २ यांचा जो काही हिस्सा येतो तो प्रतिवादी नं.१ यांना येणा—या हिश्यामध्ये येतो. वादीची अशी केस आहे की, दावा मिळकत वडीलोपार्जित असून अद्याप वाटप झाले नाही. प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की,दावा मिळकती या काही प्रतिवादी यांच्या स्वकष्टार्जीत मालकी वहिवाटीच्या आहेत. प्रतिवादी यांना दावा मिळकती वाटपाने मिळाल्या नाहीत. प्रतिवादी व वादी नं.१ व २ हे पुर्वी मजुरी करत असे. दरम्यान मुरलीधर यांनी दावा मिळकतीतील काही हिस्सा प्रतिवादी नं.१ यांना कसण्यास दिला, त्याप्रमाणे प्रतिवादी नं.१ यांनी वहिती करून, येणा—या उत्पन्नातुन ईतर नमुद मिळकती खरेदी केल्या आहेत. तसेच प्रतिवादी नं.४ यांचे थोडक्यात कथन असे आहे की, सुवर्णा कथित वादी नं.४ हिने मॅरेज पिटीशन नं.२२४/१९९५ मध्ये स्वत: वादी नं.३ करिता रोख रक्कम घेवुन सर्व हक्क सोडले होते. असे असतांना वादी नं.१ व २ यांना हाताशी धरून वादी नं.३ करवी खोटा दावा कथित वादी नं.४ यांनी केला आहे.

१३.        वरील सर्व वस्तुस्थिती व दाखल कागदपत्र पाहता असे दिसून येते की, ६ड नोंद २४६७ नुसार दावा मिळकतीचे गट नं.६७०/१, ७२०/१ ही मुरलीधर रावजी डमाळे, गट नं.६७०/३ शिवराम रावजी डमाळे यांना वाटपाने आली आहे. ६ड नोंद २९८ नुसार गट नं.४२, ६१, २७८, २७२, २७३ या मिळकती मुरलीधर रावजी डमाळे व गट नं.४२, २६, ५९, ६०, २७८, २७२, २७३ पैकी काही मिळकती शिवराम रावजी डमाळे यांना वाटपाने आल्या आहेत. बहिणी चंद्राबाई, इंदुबाई यांनी स्वखुशीने हिस्सा सोडल्याचा शेरा नमुद आहे, नि.३/९ व १०. वरील नोंद पाहता, वाटप झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. वादीचे कथन की, दावा मिळकती या आजेंबापासून प्रतिवादी नं.१ वडील व आजोबा आणि ईतर प्रतिवादी यांचे एकत्र कुटूबांच्या मिळकती

आहेत, वाटप झाले नाही, या वस्तुस्थितीला छेद देणारी आहे.

१४.        महत्वाची बाब म्हणजे वादी नं.३ यांचे दाव्यानुसार प्रतिवादी नं.४ वडील असून प्रतिवादी नं.१ शिवराम आजोबा आहेत. प्रतिवादी नं.४ यांचे कथनानुसार सुवर्णा कथीत वादी नं.४ हिने हिन्दु मॅरेज पिटीशन नं.२२४/१९९५ मध्ये स्वत: व वादी नं.३ करीता रोख रक्कम स्विकारून सर्व हक्क व अधिकार सोडून घटस्फोट घेतला. हा वादातीत मुददा असून वादी नं.३ यांना दावा मिळकतीमध्ये हिस्सा आहे किंवा कसे हा पुराव्याअंती ठरणार आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी नं.३ यांना सकृतदर्शनी नाही.

१५.        वादी नं.१ व २ यांचे असे कथन आहे की, दावा मिळकतीचे अद्याप वाटप झाले नाही. वर नमुद केल्यानुसार वाटप झाल्याची ६ड नोंद १९९५ साली दिसून येते. ही बाब वादीच्या कथनाला पुष्टी देणारी नाही. याउप्पर वादीने तर्तातुर्त मनाई नुसार अशी मागणी केली आहे की, दावा मिळकत प्रतिवादी अगर तर्फे ईतर एजंट यांनी दावा मिळकत विक्री, हस्तांतर ईत्यादी करू नये. वादी नं.१ व २ हे प्रतिवादी क्र.१ व २ यांची मुले आहेत. प्रतिवादी क्र.१ यांना वाटपानुसार आलेल्या मिळकतीमध्ये वादी क्र.१ व २ यांना हिस्सा मागण्याचा कायदेशिर हक्क आहे, सर्व दावा मिळकतीमध्ये नाही. या मुददयावर वादी नं.१ व २ यांना सकृतदर्शनी केस आहे असे नोंदविण्यांत येत आहे.

१६.        वर नमुद केल्यानुसार, वादी क्र.१ व २ यांना सकृतदर्शनी केस आहे व वादी क्र.३ यांना नाही. पुढे अनुकूलता समतोल व अपरिमित नुकसान कोणास आहे हे पहाणे महत्वाचे आहे. वादी यांनी अशी मागणी केली आहे की, दावा मिळकत प्रतिवादी यांनी विक्री किंवा हस्तांतर करू नये. प्रतिवादी हे दावा मिळकत विक्री अगर हस्तांतर करत आहेत, हे दाखविण्याकरीता वादी यांनी अभिलेखावर काही आणले नाही. तसेच एकूण वस्तुस्थिती पाहता, ६ड ची नोंद पाहता दावा मिळकतीची वाटणी होवुन शिवराम प्रतिवादी नं.१ व मुरलीधर यांची नांवे नोंद झाल्याचे दिसून येते. तसेच वादी क्र.३ यांचे दावा मिळकतीतील हक्काबाबत, हिन्दु मॅरेज पिटीशन नं.२२४/१९९५ नुसार प्रतिवादी नं.४ यांचा कथीत वादी नं.४ सुवर्णा यांचेशी झालेला घटस्फोट व रोख रक्कम स्विकारून हक्क वादी नं.३ चा सोडला हा पुराव्याअंती ठरणारा मुददा आहे. प्रतिवादी यांचे नांवाची नोंद दावा मिळकतीला झाली असून वहिती करत आहेत. वादीचा तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजुर केल्यास, दावा मिळकतीच्या वहिती व त्या अनुषंगाने कराव्या लागणा—या व्यवहारास तुतातूर्त मनाईने अडचण निर्माण होईल व प्रतिवादी

यांना दावा मिळकतीचा उपभोग घेण्यापासून एक प्रकारे वंचीत केले जाईल. तसेच, वादी यांचा दावा असा आहे की, सर्व मिळकतीला तुर्तातूर्त मनाई आदेश देण्यांत यावा. कायदयाचे तत्व प्रस्थपित आहे की, प्रतिवादीदेखिल दावा मिळकतीमध्ये सहहिस्सेदार आहेत, त्यांना दावा मिळकतीचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे. तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजुर केल्यास, त्यांना दावा मिळकतीचा उपभोग घेण्यापासून वंचित केल्यासारखे होईल.

१७. अर्थातच वादी क्र.१ व २ यांना सकृतदर्शनी केस आहे. असे असले तरी तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर करतांना अनुकूलता समतोल, अपरिमित नुकसान या बाबींचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. प्रतिवादी यांनी दावा मिळकत विक्रीस काढली किंवा कसे याबाबत अभिलेखावर वादी यांनी काही आणले नाही. वादाकरिता असे मानले की, प्रतिवादी यांनी दावा मिळकत विक्री अगर हस्तांतर केली, तरीदेखिल त्या विक्रीस लिस—पेंडसीची बाधा येणार आहे व त्याचा फायदा वादींना मिळणार आहे. एंकदीत सर्व बाबींचा विचार करता अनुकूलता समतोल प्रतिवादींचे बाजुने आहे व अपरिमित नुकसान प्रतिवादी यांचे होणार आहे असे नोंदविण्यांत येते. सबब, मुददा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष वरीलप्रमाणे नोंदवुन मुददा क्र.४ चे निष्कर्षान्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२. खर्च नियमाप्रमाणे देणेचा आहे.

स्थळ :— दिडोंरी.

(प्र.भ.लोखंडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
दिडोंरी.

दिनांक :— २८/०१/२०१३.